# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

# Date: 13 June 2024

# Time 01.00 to 01.05 PM

# Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १३ जून २०२४ दुपारी १.०० वा.

****

सर्वोच्च न्यायालयानं राष्ट्रीय पात्रता प्रवेश परीक्षा नीट-२०२४ संदर्भात प्रवेशसाठीचं समुपदेशन थांबवण्यास पुन्हा एकदा नकार दिला आहे. यासंदर्भात आज केंद्र सरकारच्या वतीनं राष्ट्रीय चाचणी संस्था, एनटीएनं आपली बाजू मांडली. वाढीव गुण मिळालेल्या १ हजार ५६३ उमेदवारांना फेरपरीक्षेचा पर्याय उपलब्ध करुन देण्यात येईल. तसंच त्यांची गुणपत्रिका रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तर, जे उमेदवार फेरपरीक्षेत सहभागी होणार नाहीत, त्यांना वाढीव गुणांचा समावेश असलेली नवी गुणपत्रिका देण्यात येणार आहे, असं सरकारच्या वतीनं सांगण्यात आलं.

दरम्यान, नीट परीक्षेदरम्यान पेपरफुटी झाली नसून कोणताही भ्रष्टाचार किंवा गैरप्रकार झाला नसल्याचं केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी म्हटलं आहे. केंद्रीय शिक्षणमंत्री म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर ते आज बोलत होते. या प्रकरणासंदर्भात केंद्रसरकार सर्वोच्च न्यायालयाच्या दिशानिर्देशांचं पालन करेल असंही त्यांनी यावेळी सांगितलं.

****

मराठवाड्यात पर्यटनातून रोजगाराच्या अनेक संधी आहेत. त्यामुळे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने पर्यटनासंबंधी विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देऊन नोकरीची संधी उपलब्ध करून द्यावी, असं विद्यापीठाचे कुलपती तथा राज्यपाल रमेश बैस यांनी म्हटलं आहे. छत्रपती संभाजीनगर इथं विद्यापीठाच्या ६४व्या दीक्षांत समारोहात आभासी पद्धतीनं मार्गदर्शन करताना आज ते बोलत होते. विद्यार्थ्यांनी व्यापक विचार करून नवीन भारताचं स्वप्न साकारावं अशी अपेक्षाही त्यांनी यावेळी व्यक्त केली.

****

'लेक लाडकी' योजनेच्या अंतर्गत १८ हजार मुलींना सक्षमीकरणाचा लाभ मिळाला असून आणखी ३८ हजार मुलींना लाभ देण्यासंदर्भात प्रक्रिया सुरू असल्याचं महिला-बाल विकास मंत्री अदिती तटकरे यांनी सांगितलं. अधिकाधिक मुलींना सक्षम करण्यासाठी या योजनेला गती देऊन जनजागृती वाढवण्यावर भर द्यावा अशा सूचना, महिला-बाल विकास मंत्री तटकरे यांनी दिल्या आहेत.

****

गेल्या ५५ वर्षाची परंपरा लाभलेल्या शेगाव ते पंढरपूर या संत गजानन महाराजांच्या पालखीनं आषाढी एकादशी निमित्त आज सकाळी साडे सात वाजता शेकडो वारकऱ्यांसह  पंढरपूरकडे प्रस्थान केलं. दरम्यान केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी शेगाव इथं संत श्री गजानन महाराजांच्या समाधीचं दर्शन घेऊन पालखी सोहळ्यास सहभागी झालेल्या वारकऱ्यांशी संवाद साधला.

****

आषाढी वारीसाठी येणाऱ्या वारकऱ्यांना पालखी मार्गावर आणि तळांवर कोणतीही अडचण येऊ नये, आषाढी वारी सर्वोत्तम व्हावी यासाठी प्रशासनाकडून सूक्ष्म नियोजन करण्यात येणार असल्याची माहिती सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली. आषाढी यात्रेच्या अनुषंगाने विठ्ठल-रुक्मिणी भक्त निवास, पंढरपूर इथं पालखीसोहळा प्रमुख आणि प्रशासन यांच्या बैठकीत काल ते बोलत होते.

****

परभणी, नांदेड  आणि हिंगोली जिल्ह्यात अद्यापही पेरणीयोग्य पाऊस झालेला नाही, त्यामुळे या ठिकाणी ७५ ते १०० मिली मीटर पाऊस झाल्याशिवाय शेतकऱ्यांनी पेरणी करु नये, असं आवाहन वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या हवामान विभागानं केलं आहे. ज्या भागात पाऊस चांगला झाला आणि पाण्याची सुविधाही आहे अशा ठिकाणच्या शेतकऱ्यांनी पेरणी करावी. मात्र, कमी पाऊस झालेल्या ठिकाणी जमिनीत उष्णता असल्यानं पेरणी केलेलं बियाणं खराब होऊ शकतं, त्यामुळे जमिनीतील गारवा आणि चांगला पाऊस झाल्याशिवाय पेरणी न करण्याचा सल्ला हवामान तज्ज्ञ डॉ. कैलास डाखोरे यांनी दिला आहे.

****

येत्या दोन दिवसात कोकण आणि विदर्भात बऱ्याच ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे. या काळात मराठवाड्यात काही ठिकाणी पावसाची शक्यता असून तुरळक ठिकाणी विजांचा कडकडाट आणि मेघगर्जनेसह सोसाट्याचे वारे वाहतील

असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे. दरम्यान, लातूर आणि धाराशीव जिल्ह्यात मुसळधार पावसाची शक्यताही हवामान विभागानं व्यक्त केली.

****

अकोला जिल्ह्यात काल सायंकाळी विजांच्या कडकडाटासह जोरदार पाऊस पडला, या दरम्यान, अकोला तालुक्यातील डोंगरगाव इथं वीज पडून अल्पभूधारक शेतकऱ्याच्या एका म्हशीचा मृत्यू झाला तर दोन म्हशी गंभीर जखमी झाल्या आहेत. या घटनेत या शेतकऱ्याचं सुमारे दीड लाख रुपयांचं नुकसान झालं आहे.

****